REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १९ जानेवारी, १९३८ अंक ३



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ
टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

विक्रीस तयार ] विक्षिप्तराव [ दुसरी आवृत्ति

लेखकः—प्रो. वा. गो. काळे

एका काळीं फार प्रसिद्धी पावलेलें हें तीन अंकी प्रहसन परत लोकाग्रहास्तव छापून प्रसिद्ध केलें आहे. 'विक्षिप्तराव' प्रहसनाची ही दुसरी आवृत्ति अठ्ठावीस वर्षांनीं प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. हें प्रहसन स्त्रीपात्रविरहित असल्यानें शाळांमधून तें करण्यास फार उपयुक्त आहे. किंमत फक्त १० आणे.




स्टॉकिस्ट : मा. मो. कुलकर्णी, किराणा मालाचे व्यापारी,
पुष्करणी चौक, पुणें २

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.'

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव } पुणें २. भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

— मनपसंत काम —
वक्तशीरपणाची ] रिसवूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदाजवळ, पुणें.

# विविध माहिती

### जर्मन जादूगार

जादूगारांनीं आपल्या खेळांत कोंबड्यांचीं अंडीं व इतर खाद्य पदार्थांचा उपयोग करूं नये असा हुकूम जर्मन सरकारानें काढला असल्याची माहिती एका लेखकानें दिली आहे. ह्या तऱ्हेनें दांत कोरून पोट कसें भरणार ?

### प्रसिद्ध साहित्यिकांची मालमत्ता

सर जेम्स बॅरी ह्या ब्रिटिश लेखकानें २२ लक्ष रुपयांची मालमत्ता आपणांमागें ठेवली. हॉल केनची मालमत्ता ३२ लक्ष रुपये आणि रुडिआर्ड किप्लिंगची २५ लक्ष होती.

### परीक्षांची जुगार !

एक विद्वान गृहस्थ म्हणतात. "दहा अनुभवी परीक्षकांस विद्यार्थ्यांच्या दीडशे उत्तरांचे कागद तपासण्यास सांगितलें. ह्या दीडशे कागदांपैकीं फक्त एकाचे बाबतींत सर्वांनीं दिलेले गुण जुळले. बाकीच्यांचे बाबतींत शंभर गुणांत एकूणचाळीस एवढा फरक पडलेला दिसून आला."

### लढाऊ खेळणीं

टोकिओच्या बाजारांत विक्रयास ठेवलेल्या मुलांच्या खेळण्यांमध्यें बंदुका, तोफा, विमानें इत्यादि लढाऊ जातीच्या जिनसांचा विशेष भरणा असतो असें एक लेखक सांगतो. पाश्चात्य देशांत हाच प्रकार कमी-अधिक प्रमाणांत आढळतो. जागतिक शांततेची घोषणा आणि मुलांच्या हातांत लढाऊ खेळणी ह्यांचा मेळ कसा बसावयाचा ?

### मुलांचीं स्वदेशीं खेळणीं

पंधरा-वीस वर्षांमागें इंग्लंडमध्यें खपणाऱ्या खेळण्यांतलीं शेकडा नव्वद परदेशी बनावटीचीं असत. अलीकडे साठ टक्के खेळणीं ब्रिटनमध्यें केलेलीं असतात.

### मासे आणि लोकर

जर्मनीमध्यें शास्त्रीय प्रयोगांतीं माशांपासून लोकर तयार करण्याचा धंदा प्रस्थापित होण्याची शक्यता सिद्ध झाली आहे.

### "स्वतंत्र आयर्लंड"मध्यें औद्योगिक भांडवल खपवणारी मंडळी

औद्योगिक मंडळ्यांस लागणारें भांडवल भागांच्या स्वरूपांत खपवून देण्यासाठी तेथील सरकारच्या विद्यमानें स्वतंत्र आयर्लंडमध्यें एक कंपनी स्थापन झालेली आहे. आजपावेतो तिच्या वतीनें सुमारें सहा कोटि रुपये किंमतीचे औद्योगिक मंडळ्यांचे भाग लोकांमध्यें खपले आहेत.

### अमेरिकन जनतेची वार्षिक प्राप्ती

जून, १९३७ अखेर पुऱ्या झालेल्या बारमाहींत अमेरिकन जनतेची एकूण मिळकत सुमारें १७,००० कोटि रुपये भरली. त्यापैकीं २,००० कोटि रुपये इतकी मिळकत शेतकरी वर्गाची होती.

### कामगारांचा उत्साह टिकविण्यासाठी रेडिओची योजना

आपल्या गिरणींतील कामगारांस थकवा येऊं नये व त्यांचा उत्साह टिकावा ह्याकरितां ग्रेटब्रिटनमधील एका कारखानदारानें रेडिओची योजना केली आहे. कामगार मधुर संगीत श्रवण करीत मजेंत काम करतात, असा तेथील अनुभव आहे. उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो कीं काय, हें अद्याप निश्चितपणें दिसून आलेलें नाहीं.

### साखरेच्या उद्योगासंबंधीं चौकशी

साखरेच्या उद्योगास सहाय देण्याच्या हिंदुस्थानसरकारच्या योजनेस प्रारंभ करण्यापूर्वी त्या बाबत पूर्ण चौकशी करण्यासाठीं सरकारनें मि. लिव्हिंगस्टन ह्यांची नेमणूक केली होती. मि. लिव्हिंगस्टन ह्यांचें काम १९३९ पर्यंत चालेल अशी अपेक्षा आहे. साखरेबरोबरच गूळ, काकवी, इत्यादींच्या उद्योगासंबंधींहि चौकशी करण्यांत येणार आहे.

### रस्त्यांवरील अपघात

ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यांवरील अपघातांत १९३७ सालीं २,३२,९३० लोक सांपडले, त्यांपैकीं ६,५९१ लोकांस अपघात मृत्युदायक ठरले.

### मुंबई सरकारच्या अबकारी खात्याचा अहवाल

मुंबई सरकारास १९३६–३७ सालीं एकूण ३,२२,६७,००० रु. अबकारी उत्पन्न मिळालें. हा आकडा १९३५–३६ सालांतील उत्पन्नाचे मानानें ७ लाखांनी कमी आहे. देशी दारूच्या खपांत कांहीं फरक पडला नाहीं, परंतु ताडीचा खप मात्र वाढलेला दिसतो. विलायती दारु ज्यास्त खपली. गांजा, भांग, चरस, कोकेन, अफू, ह्या सर्वच मादक द्रव्यांचा खप पूर्वीच्या वर्षाइतका झाला नाहीं.

### औषधांची आयात

१९३६–३७ सालीं एकूण २ कोटि, ७ लक्ष रुपये किंमतीचीं औषधें हिंदुस्थानांत उतरलीं. १९३४–३५ सालीं ३९ लक्ष रुपयांची पेटंट औषधें हिंदुस्थानांत आलीं; १९३५–३६ सालीं ही आयात २५ लाखांनीं वाढली व १९३६–३७ सालीं ती ६८ लक्ष रुपयांची झाली. एकूण आयात औषधांपैकीं शेकडा त्रेचाळीस इतकी औषधें ब्रिटिश असतात. कोयनेलची आयात १९३५-३६ च्या मानानें उतरली. कॉडलिव्हर तेल मात्र सुमारें दुप्पट आलें. कापूर मुख्यत: जपान व जर्मनी ह्या देशांतून येतो. ह्या पदार्थाच्या आयातीची किंमत २१ लक्ष रुपये भरली.

### प्रो. ग्रेगरी ह्यांचें आगमन.

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार, प्रो. ग्रेगरी, हे गेल्या आठवड्यांत आपल्या कामावर रुजूं होण्यासाठी हिंदुस्थानांत दाखल झाले. सरकार त्यांचेकडे कोणतें काम सोपविणार आहे, ह्याची अद्याप त्यांस माहिती नाहीं, असें ते एका मुलाखतींत म्हणाले.

### व्यवसायात्मक शिक्षणक्रमाची आखणी

डॉ. झकीर हुसेन ह्यांच्या कमिटीनें आखलेल्या, शाळांतील मुलांच्या शिक्षणपद्धतीचा विचार करून त्याबाबत तपशीलवार सूचना करण्याकरितां मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीनें आपलें काम दोन महिन्यांत पुरें करावयाचें आहे. रावबहादुर के. जी. जोशी ( सेवानिवृत्त एज्युकेशनल इन्स्पेक्टर ) हे कमिटीचे अध्यक्ष आहेत.

### अमेरिकेंतील प्रचंड धरण

अमेरिकेंतील सॅक्रॅमेंटो नदीवर धरण बांधण्याची योजना प्रसिद्ध झाली आहे. ह्या धरणाच्या बंधाऱ्याची लांबी ३,१०० फूट व उंची ५६० फूट होईल. बांधकामास लागणाऱ्या कॉंक्रीटनें भरलेल्या मालगाडीची लांबी २०० मैल भरेल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | |
|---|---|
| २–१–३८ ते ८–१–३८ | ३७,३४,७६३ |
| ९–१–३८ ते १५–१–३८ | २५,०८,३५९ |
| २१–९–३१ ते १५–१–३८ | ३,०८,८५,३४,२०३ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | २६ |
| २ ग्वाल्हेरमधील सहकारी परिषद | २७ |
| ३ ग्वाल्हेर संस्थानांतील सहकारी चळवळ | २८ |
| ४ स्फुट-विचार | २९ |
| रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा—रिझर्व्ह बँक आणि सहकारी बँक्स—रिझर्व्ह बँक आणि सावकार—शेतकऱ्यांची हलाखी दूर करण्याचा प्रयत्न—ग्रेट-ब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील वाटाघाटी. | |
| ५ मुंबई कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश | ३० |
| ६ रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा | ३१ |
| ७ बँक ऑफ इंडिया लि. | ३४ |
| ८ किनाऱ्यालगतच्या समुद्रावरील वहातुक | ३३ |
| ९ निवडक बाजारभाव | ३४ |
| १० हरिपुरा येथील प्रदर्शन | ३५ |



# अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९३८


## ग्वालेरमधील सहकारी परिषद

संस्थानामधील सहकारी संस्था व बँक्स ह्यांच्या घटनेंत व कार्यपद्धतींत करावयाच्या सुधारणांचा विचार करण्यासाठी गेल्या शनिवारीं व रविवारीं ग्वालेर येथें एक महत्त्वाची परिषद भरली होती. परिषदेचें उद्घाटन स्वतः ग्वालेरच्या महाराजांनीं केलें आणि तिचें अध्यक्षस्थान प्रो. काळे ह्यांस देण्यांत आलें. ह्या संस्थानांत सहकारी पतपेढ्या व बँक्स स्थापन होऊन अनेक वर्षें झालीं आहेत. तथापि त्यांमध्यें व्हावी तशी प्रगति तर झालीच नाहीं, पण ह्या संस्थांची स्थिति बरीच बिघडली असल्याचें दिसून आलें. म्हणून, ह्या परिस्थितीची चौकशी व ती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचें काम प्रो. काळे ह्यांचेकडे सोंपवण्यांत आलें. त्यांच्या शिफारसीप्रमाणें सहकारी संस्थांशीं संबंध असलेल्या मंडळींची परिषद बोलावण्यांत आली. रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर दिवसगत होऊं न देतां सुधारणा व प्रगति ह्याविषयींचे प्रश्न तात्काळ हातीं घेण्यांत ग्वालेर दरबारनें दाखविलेल्या तत्परतेबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. विशेषतः, ग्वालेरच्या तरुण महाराजांनीं ह्या महत्त्वाच्या विषयांत स्वतः लक्ष घालून विधायक कार्यक्रमास चालना दिली ह्याविषयीं त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच होणार आहे. महाराजांनीं शेतकरीवर्गाच्या उन्नतीबाबत कळकळ व्यक्त करून तिला शक्य तितकें सहाय देण्याचें आपलें निश्चित धोरण जाहीर केलें. त्याचप्रमाणें, आपल्या प्रजाजनांपैकीं शिकलेल्या, सुबुद्ध व सुस्थितींतल्या लोकांनीं सहकारी चळवळ आणि ग्रामसुधारणाकार्य ह्यांमध्यें भाग व पुढाकार घ्यावा असें त्यांनीं सुचविलें तें विशेष उल्लेखनीय आहे. सार्वजनिक चौकशीच्या रिपोर्टांतील सूचना कागदांत व दप्तरीं रहातात असा सामान्य अनुभव आहे. प्रो. काळे ह्यांचा रिपोर्ट, त्यांनीं सुचविलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करण्याचा ग्वालेर दरबारचा निश्चय आणि प्रत्यक्ष महाराजांनीं सहानुभूतीचें व सहायाचें दिलेलें आश्वासन ह्या सर्व गोष्टी अकरा महिन्यांच आंत घडून आल्या ही गोष्ट ग्वालेर सरकारास सर्वस्वीं भूषणावह आहे.

ग्वालेरच्या महाराजांनीं आपल्या संस्थानांत ग्रामसुधारणा घडवून आणण्यासाठी एक कोटि रुपयांचा निधि बाजूस काढून ठेवल्याचें मागेंच जाहीर केलें असून त्यावरील व्याजाचा विनियोग उद्देशित कार्याप्रीत्यर्थ कसा करावा ह्याविषयींची योजना आखण्याकरितां एक समिति नेमली होती. तिच्या सूचना दरबारास सादर झालेल्या आहेत. ग्रामसुधारणेच्या कार्याचा सहकारी चळवळीशीं निकट संबंध असल्यानें गेल्या आठवड्यांतल्या ग्वालेर येथील परिषदेस विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. ह्या गोष्टीचा उल्लेख अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांच्या भाषणांत प्रामुख्यानें करण्यांत आला असून महाराजांनींहि आपल्या प्राथमिक भाषणांत त्याचें दिग्दर्शन केलें. ग्वालेर सरकारनें लक्षावधि रुपये शेतकऱ्यांस कर्जाऊ मिळावे म्हणून एकूण अठरा स्थानिक बँकांमध्यें ठेवींच्या स्वरूपांत ठेवले आहेत आणि सहकारी पतपेढ्यांस कर्जें देण्यांत त्यांचा उपयोग केला जात आहे. परंतु ह्या बँका बिनसहकारी असून त्यांचें बहुतेक कार्य सरकारी अधिकाऱ्यांच्या मार्फत व नियंत्रणाखालीं चालतें, हा ह्या पद्धतींत ठळक दोष आहे. त्याचे योगानें बँका व सहकारी पेढ्या ह्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं आणि बँका केवळ सरकारी पैसा वांटणाऱ्या व अधिकाऱ्यांच्या हातून तो परत गोळा करणाऱ्या संस्था होऊन बसल्या आहेत. ही पद्धति बदलावी आणि बँका सहकारी संस्था म्हणून नोंदल्या जाव्या म्हणजे त्या व पतपेढ्या ह्यांच्यामध्यें जिव्हाळ्याचें परस्पर सहायाचें नातें उत्पन्न होईल अशी सूचना प्रो. काळे ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत व भाषणांत केली. त्यांची दुसरी महत्त्वाची शिफारस शेतकरीवर्गास लांब मुदतींचीं कर्जें देण्यासाठीं जमीन गहाणाचा व्यवहार करणाऱ्या स्वतंत्र बँका स्थापन करण्यासंबंधाची होती. सहकारी चळवळीचें क्षेत्र विस्तृत करून मालाची खरेदी-विक्री, विमा व्यवसाय, लहान उद्योगधंद्यांची वाढ, संयुक्त शेती इत्यादि मार्ग तिला मोकळे करून द्यावे, असेंहि त्यांनीं सुचविलें. सहकारी तत्त्व आणि कार्यपद्धति ह्यांचें शिक्षण चळवळीशीं संबंध असलेल्या सर्व लोकांस देण्याची तरतूद होण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं विशेष जोर दिला. गेल्या कित्येक वर्षांच्या अनास्थेमुळें ग्वालेर संस्थानांतील सहकारी चळवळीची प्रगति व विकास खुंटून गेला आहे आणि आपण सुचवलेल्या सुधारणा झाल्यास तिला पुन्हां चालना मिळण्याची अडचण येणार नाहीं असा विश्वास प्रो. काळे ह्यांनीं प्रकट केला. ग्वालेरचे महाराज व सरकार ह्यांचें धोरण सहानुभूतीचें आणि प्रगतिपर आहे. त्या अनुकूल संधीचा पूर्ण फायदा लोकांनीं घ्यावा आणि सरकारी व बिनसरकारी सर्व प्रजाजनांनीं आपली शक्ति व उत्साह एकवटून आर्थिक मंदीच्या चिखलांत रुतलेला सामाजिक जीवनाचा गाडा पुढें ढकलीत न्यावा अशी कळकळीची विनंति त्यांनीं केली. हें कार्य सुकर व सुव्यवस्थित व्हावें ह्या हेतूनें त्यांनीं प्रगताची पंचवार्षिक तपशीलवार योजना आखली आहे. तो कार्यक्रम नेटानें व निश्चयानें पार पाडण्याचें ग्वालेरचे अधिकारी व प्रजा यांनीं ठरवल्यास ग्रामसुधारणेचें त्यास सहाय मिळून सहकारी चळवळीचा व शेतकरीवर्गाचा उत्कर्ष निःसंशय होईल. ह्या दोन चळवळी बरोबर सारख्या चालणें अगत्याचें असल्याविषयीं प्रो. काळे ह्यांच्या भाषणांत विवेचन आहे. त्यांत जनतेची प्राप्ति वाढण्याचें मूलग्राही महत्त्वहि त्यांनीं प्रतिपादिलें आहे.

## ग्वालेर संस्थानांतील सहकारी चळवळ

( ग्वालेर येथें ता. १५ जानेवारी रोजीं सहकारी परिषदेस प्रारंभ झाला. ग्वालेर दरबारचे गृहमंत्रि, सर मनुभाई मेहता, ह्यांनीं प्रथम स्वागतपर भाषण केल्यावर महाराजासाहेबांनीं पुरस्कारात्मक भाषण करून परिषदेचें उद्घाटन केलें. प्रो. काळे ह्यांचें नंतर अध्यक्षीय भाषण झालें, त्याचा गोषवारा खालीं दिला आहे. )

### प्रो. काळे ह्यांचें अध्यक्षीय भाषण

हिज हायनेस महाराजासाहेब ह्यांच्या इच्छेनुरूप मी ग्वालेर संस्थानांतील सहकारी संस्थांची पहाणी करून रिपोर्ट सादर केला. ह्या संस्था भरभक्कम पायावर स्थापित करण्याविषयीं सरकारास वाटत असलेल्या कळकळीचेंच प्रस्तुत परिषद् हें फळ आहे. महाराजासाहेबांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सहकारी चळवळीस सरकार आवश्यक तें सहाय देईल असें आश्वासन दिलें; मात्र लोकांनीं आपल्या वांट्याची कामगिरी करण्यास चुकतां कामा नये, असें सांगितलें. हें धोरण सहकारी तत्त्वास पूर्णपणें धरूनच आहे.

ग्वालेरमधील सहकारी चळवळींतील कांहीं दोष वेळींच काढून न टाकले गेल्याकारणानें सध्याच्या आर्थिक मंदीचे काळांत ती चळवळ जास्तच दुःस्थितींत आली आहे. रोगाचें हें मूळ नाहींसे होण्यास ग्रामसुधारणेच्या नियोजित चळवळीचें सहाय मिळून जनतेची स्थिति सुधारण्याचा मार्ग सुगम होईल, अशी अपेक्षा आहे. ग्रामोद्धार व सहकार ह्या दोनहि चळवळींचें ध्येय एकच असल्यानें, त्या दोन्ही परस्परपोषक आहेत. ह्याकरितां ग्रामोद्धाराची योजना आखणाऱ्या कमिटीच्या सूचनांचा अवलंबहि सत्वर केला जाणें इष्ट आहे. शेतकऱ्यांची रहाणी सुधारण्याकरितां अनेकविध प्रयत्नांची आवश्यकता आहे.

सहकारी चळवळीच्या उद्देशाचें व्यापक स्वरूप हिंदुस्थानांत ध्यानीं न ठेवलें गेल्यामुळें, ह्या चळवळीपासून अपेक्षित फायदा झालेला दिसत नाहीं. कर्जें स्वस्त व सुलभतेनें दिल्यानें केवळ भागत नाहीं. जनतेच्या सर्वंध आयुष्यक्रमास नवें व इष्ट असें वळण लावून लोकांमध्यें आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. असें झालें तरच सहकारी चळवळ यशस्वी झाली असें म्हणतां येईल.

सध्याच्या परिस्थितीचें पूर्ण आकलन आणि तिच्या सुधारणेच्या कार्याची आखणी हीं कामें प्रस्तुत परिषदेनें करावयाचीं आहेत. माझ्या रिपोर्टांत, चळवळीच्या प्रगतीची दिशा मी निश्चितपणें दिग्दर्शित केली असून माझ्या सूचनांपैकीं कांहींच्या अंमलबजावणीस आतां आरंभहि झालेला आहे. चळवळीच्या वेगवेगळ्या घटकांचे कार्यांत एकसूत्रीपणा कसा आणतां येईल; हें आतां ठरवावयाचें आहे.

प्राथमिक पतपेढ्यांचे सभासदांस जबाबदारीची जाणीव करून देऊन त्यांस आपला कारभार सुव्यवस्थितपणें व किफायतशीर रीतीनें चालवितां येईल अशी व्यवस्था करणें, सोसायट्या व बँका ह्यांची नीट सांगड घालून ह्या दोन्ही संस्था एकाच व्यापक चळवळीचे भाग आहेत अशी जाणीव निर्माण करणें, सहकारी खात्याचें बँकांवरील नियंत्रण मर्यादित करून त्यांचेवर प्राथमिक पेढ्यांच्या प्रगतीची व स्वतःच्या व्यवस्थित कारभाराची जबाबदारी टाकणें, सहकारी चळवळीच्या क्षेत्राची मर्यादा व्यापक करून जमीन गहाण, खरेदी-विक्री, ग्रेन, बेटर लिव्हिंग, हौसिंग, अर्बन क्रेडिट, विमा इत्यादि गोष्टी सहकाराच्या कक्षेंत आणणें, सहकारी शिक्षण, प्रचार इत्यादींची तरतूद करणें, लोकांत सहकारी चळवळीविषयीं आस्था व गोडी निर्माण करणें, इत्यादि सुधारणेच्या दिशा आहेत. हें सर्व काम नव्यानेंच सुरू करण्याचें नसून, कांहीं बाबतींत केवळ नवीन वळण लावून कार्यक्षमता वाढविल्यानेंहि भागणार आहे.

हिंदुस्थानांतील इतर ठिकाणच्या अनुभवाचा फायदा ग्वालेरमधील नियोजित योजनांस मिळणार असून गतकालांतील चुका व अडचणी ह्यांचाहि आपणांस उपयोग होणार आहे. नियोजित सुधारणा कित्येकांस तीव्र स्वरुपाच्या वाटतील व त्या पार पाडण्याची जबाबदारी हलकी नाहीं. परंतु, आहे त्या परिस्थितींत इष्ट तो पालट घडवून आणतांना उपाययोजना कडक म्हणून माघार घेऊन भागणार नाहीं. सहकारी चळवळीची जागा घेण्यास दुसरी कोणतीहि योजना जोपर्यंत समर्थ नाहीं, तोपर्यंत अडचणींवर व दोषांवर भर देऊन स्वस्थ बसण्यांत काय अर्थ आहे? ग्वालेरमधील सहकारी चळवळीच्या उर्जितावस्थेकरितां सुचविलेल्या पंचवार्षिक योजनेवरून सुधारणा क्रमाक्रमानें व तर्कशुद्ध मार्गानें घडवून आणण्याचें धोरण स्पष्ट होईल. प्रारंभीं कांहीं काळ सहकारी खात्यावर कामाचा विशेष ताण पडेल, परंतु सरकारी अधिकारी व नोकरवर्ग हे मनोभावानें व तत्परतेनें सहाय करतील असा भरंवसा वाटत आहे. ग्वालेर दरबारची शेतकरी वर्गाविषयींची कळकळ सांप्रदायिकच आहे व महाराजासाहेबांच्या आजच्या पुरस्कारात्मक भाषणानें तिचें पुनरपि प्रत्यंतर आलेलें आहे. आलेल्या ह्या सुवर्णसंधीचा फायदा घेऊन जनहित साधण्याचे कार्य लोकांनी हातीं घ्यावे असें मी सुचवितो.

---

शिवणकलेचें अनुभविक शिक्षण मिळण्याचें
हिंदुस्थानांत फक्त हें एकच ठिकाण
**दि मॉडर्न टेलरिंग इन्स्टिट्यूट**
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
चालक–एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)

---

**औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.**
( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस–औंध ( सातारा )
शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी, बिचूद स्टेशन व दिघंची.
चालूं ठेवीवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.
कर्जें–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जें दिलीं जातात.
चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
B. R. Vartak
मॅनेजर.

# स्फुट विचार

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

(१) रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या नाहींत अशा व्यक्ती किंवा संस्था बँकिंगचा धंदा करीत असूनहि त्या बँकेच्या कक्षेत येत नाहींत त्यासंबंधांत काय व्यवस्था करतां येईल (२) आणि शेतीच्या धंद्यास पैसा पुरवला जाण्याबाबत व त्याचा संबंध मध्यवर्ती बँकेशी कसा जोडतां येईल ह्याविषयीं रिझर्व्ह बँकेनें तिच्या स्थापनेपासून तीन वर्षांचे आंत हिंदुस्थान सरकारास रिपोर्ट करावा अशा आशयाचें त्या बँकेच्या कायद्यांत एक कलम आहे. त्यास अनुसरून सदरहु बँकेनें वरील दोन बाबींचे संबंधानें आपलें म्हणणें सरकारास कळवलें असून तें आतां प्रसिद्ध झालें आहे. रिझर्व्ह बँक स्थापन झाल्यामुळें शेतीच्या धंद्यास भांडवलाचें सहाय सहज मिळालें पाहिजे अशी कोणाची कल्पना असल्यास ती चुकीची आहे ही गोष्ट त्या बँकेच्या रिपोर्टांत स्पष्ट करण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँकेस ज्या बँक्स जोडण्यांत आल्या आहेत, त्यांच्यामधील ठेवींस आधार म्हणून जी रोकड किंवा खेळता पैसा शिल्लकी बाळगावा लागतो, तो रिझर्व्ह बँकेनें आपल्या ताब्यांत घेतला असल्यानें त्याचा विनियोग बँकांस येणाऱ्या विशेष अडचणीच्या प्रसंगींच केला जावयाचा आहे आणि म्हणून तो शेतीच्या किंवा इतर धंद्यांमध्यें गुंतवतां येणें अशक्य व अनिष्ट आहे. सामान्य व्यापारी बँकांसहि जो पैसा कर्जाऊ न देतां ठेवी निश्चितपणानें परत करतां याव्या म्हणून जवळ बाळगावा लागतो, तोच पैसा रिझर्व्ह बँकेंत एकत्रित होतो आणि म्हणून तो तिच्यापाशींहि पडूनच रहावा लागतो. हा निधि कांहीं जोडलेल्या बँकांवर तसा प्रसंगच आल्यास त्यांस तात्पुरता कर्जाऊ देण्यांत उपयोगांत आणतां येईल, पण मामुली पद्धतीचीं कर्जें देण्याकडे त्याचा उपयोग करतां येणार नाहीं. शेतकऱ्यांस कर्जाच्या स्वरूपांत सरकार सहाय करतें व करूं शकतें तसें रिझर्व्ह बँकेस, त्या संस्थेचा उद्देश व तिच्या कार्याची व्याप्ती पहातां, करतां येणार नाहीं. ह्या रीतीनें, स्वतःच्या भूमिकेचें आवतत्व रिझर्व्ह बँकेनें आपल्या रिपोर्टांत असंदिग्धपणानें पुढें मांडलें आहे.

## रिझर्व्ह बँक आणि सहकारी बँक्स

असें आहे तर रिझर्व्ह बँक आर्थिक व्यवहारांत लोकांस उपयोगी केव्हां व कशी पडणार ? ह्या प्रश्नास त्या बँकेचें असें स्वच्छ उत्तर आहे कीं कर्जाच्या देण्याघेण्याचा धंदा करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती ह्यांनीं रोजच्या मामुली व्यवहारांसाठीं लागणाऱ्या पैशाची तजवीज स्वतःच्या संपत्तिक सामर्थ्यावर अवलंबून केली पाहिजे आणि त्यांस ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या तोंडाकडे पाहातां येणार नाहीं. व्यवहारांत खेळणारा पैसा आणि बँकिंगचा धंदा करणाऱ्या संस्था व व्यक्ती ह्यांच्या जवळचा चलनाचा साठा देवघेवींच्या मानानें एकंदरीनें अपुरा पडता आहे असें होईल तेव्हांच मध्यवर्ती बँकेनें मध्यें पडून ही चणचण दूर करावयाची असते. आगीचा बंब ज्याप्रमाणें शेतांस किंवा बागांस दररोज पाणी घालण्यास वापरावयाचा नसतो, त्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेजवळचा निधि मामुली कर्जाकरितां उपयोगांत आणतां येत नाहीं, असें त्या बँकेचें म्हणणें आहे. सहकारी बँका शेतीच्या धंद्यास पैसा पुरवतात आणि त्या धंद्याच्या गरजा व परिस्थिति हीं विशिष्ट प्रकारचीं असल्यानें त्यांनीं तरी रिझर्व्ह बँकेकडून स्वस्त भांडवलाची अपेक्षा करावी कीं नाहीं ? ह्या प्रश्नास त्या बँकेचें असें उत्तर आहे कीं सहकारी बँकांस पैसा कसा व कोणत्या कारणाकरितां पुरवावा हें कायद्याच्या १७ व्या कलमांत तपशीलवार व स्पष्ट सांगितलें आहे; आणि त्याप्रमाणें पैसा सहकारी बँकांस कर्जाऊ द्यावा किंवा नाहीं हें प्रत्येक वेळीं परिस्थिति पाहून रिझर्व्ह बँक ठरवील. आपण कोणत्या परिस्थितींत व कोणत्या अटींवर सहकारी बँकांस कर्जाऊ रकमा देऊं ह्या विषयींचें आपलें म्हणणें वेळोवेळ त्यांस तिच्याकडून कळवण्यांत येईल आणि ह्या अटी पुऱ्या झाल्या तर कर्ज मागण्याची व देण्याची पद्धति कोणती राहील ह्याचाहि खुलासा केला जाईल. चांगल्या बँकांच्याजवळ स्वतःचा भरपूर पैसा असल्यानें त्यांस रिझर्व्ह बँकेच्या सहायाची आवश्यकता नाहीं आणि इतर बँकांस रिझर्व्ह बँकेच्या अटी पुऱ्या न करतां आल्यानें त्यांस सहाय देतां येणें शक्य नाहीं. एवंच तूर्त तरी सहकारी चळवळीस रिझर्व्ह बँकेचा उपयोग होण्याची फारशी आशा दिसत नाहीं.

## रिझर्व्ह बँक आणि सावकार

शेतीचा धंदा व सहकारी बँक्स ह्यांची याप्रमाणें वासलात लागली असतां देशांत खेळणाऱ्या चलनाचें नियमन करण्याचें आपलें मुख्य कार्य रिझर्व्ह बँक कसें घडवून आणणार हा महत्त्वाचा प्रश्न राहिला. शेतकऱ्यानें विक्रीस आणलेल्या मालाच्या किंमतीसाठीं सावकारांनीं त्यांचेवर हुंड्या काढाव्या आणि त्या मोठ्या व्यापारी बँकांस विकाव्या; म्हणजे रिझर्व्ह बँक अशा हुंड्यांवर त्या बँकांस पैसे देईल. ज्या ठिकाणीं बँकिंगच्या विशेष सोयी नाहींत तेथें शेतकऱ्यांस भारी दरानें व्याज द्यावें लागतें. अशा परिस्थितींत त्यांच्या मालावरील हुंड्या सवलतीच्या दरानें रिझर्व्ह बँक खरेदी करील; ह्या सवलतीचा फायदा मात्र शेतकऱ्यांच्या पदरांत पडण्याविषयींची खात्री असली पाहिजे. देशी पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या सराफांचे बाबत रिझर्व्ह बँकेनें एक योजना तयार केली आहे, पण ती सराफांस पसंत पडलेली नाहीं. विश्वसनीय व्यापारी हुंड्यांचा प्रसार जोरानें होऊन त्यांच्या मार्गानें बँकांच्या मार्फत पैसा व्यवहारांत कसा खेळवतां येईल ह्या विषयींच्या योजनेचा रिझर्व्ह बँक विचार करीत आहे. म्हणजे, शेती व देशांतील अंतर्गत व्यापार ह्यांस पैसा पुरवण्याचें साधन आज त्या बँकजवळ नाहीं. ह्यास्तव, त्या बँकेच्या कायद्यांत एतद्विषयक दुरुस्त्या होण्याविषयींच्या सूचना सरकारास तिनें करावयाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. ती बँक आणि देशी सराफ ह्यांचेमध्यें तडजोड होऊन एखादी समाधानकारक योजना अमलांत येईल आणि मालावर काढल्या जाणाऱ्या हुंड्यांचा व्यवहार जोरानें चालू होईल तेव्हांच रिझर्व्ह बँकेचा उपयोग देशाच्या आर्थिक कार्यास होणार. तोंपर्यंत ती संस्था नावापुरती मध्यवर्ती बँक म्हणून रहाणार हें उघड आहे.

## शेतकऱ्यांची हलाखी दूर करण्याचा मुंबई सरकारचा प्रयत्न

खेड्यांतील जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचा कार्यक्रम मुंबई सरकार लवकरच हातीं घेणार आहे अशी घोषणा प्रधानमंडळानें विधिमंडळाच्या गेल्या बैठकीचे वेळीं केली होती, त्याप्रमाणें मुंबई सरकारनें आपली योजना विलांचे रूपानें आतां जाहीर केली आहे. शेतकरी वर्गाची हलाखी दूर करण्याच्या आपल्या

कार्यक्रमांत सरकारनें कर्जफेड तहकुबीस अग्रस्थान दिलें आहे. कारण, तात्कालिक उपाय म्हणून त्यास विशेष महत्त्व आहे. कर्जफेड तहकुबीचा कायदा ३१ मार्च, १९३९ अखेर अमलांत राहून त्याचा फायदा ज्यांची पाण्याखालील जमीन पांच एकरांपेक्षां कमी किंवा इतर जमीन पंधरा एकरांपेक्षा कमी आहे अशा कर्जबाजारी शेतकऱ्यांस मिळावा, अशी योजना आहे. कर्जाची वसुली करविणारे इलाज ह्या मुदतींत तहकूब रहाणार आहेत. ३० जून, १९३८ अखेर संपणाऱ्या वर्षाबाबतचा खंड शेतकऱ्यानें दिला असल्यास, त्यास वरील कायद्यानें संरक्षण मिळणार आहे. मात्र तो १९३२ सालापासून खंडकरी असला पाहिजे. कर्जवसुलीची बंदी थोडा वेळ अमलांत राहून, मध्यंतरीच्या काळांत तिला पोषक अशा योजना हातीं घेतल्या गेल्या नाहींत तर तहकुबीचा कांहीं उपयोग होणार नाहीं, ह्याची जाणीव प्रांतिक सरकारास आहे. कर्ज लवादमंडळें नेमण्याचा सरकारचा निश्चय मागेंच जाहीर झाला आहे. कर्जाऊ पैसे देणाऱ्या व्यक्ती, बँका, विमा कंपन्या ह्या सर्वांस वार्षिक नोंदणीची सक्ती करणारें एक बिलहि येत्या कायदेमंडळापुढें येणार आहे. त्या अन्वयें हा धंदा करणारांवर प्रमाणबद्ध फी बसविली जाईल. व्याजाचा कमाल दर निश्चित करण्याचीहि बिलांत तरतूद आहे. मुद्दलापेक्षा थकलेल्या व्याजाची रकम ज्यास्त असल्यास ती धनकोस वसूल करतां येणार नाहीं. मुंबई सरकारनें शेतकऱ्यांच्या कर्जाचें ओझें हलकें करण्याची योजना आखली आहे, तिला पोषक असा दुसरा विधायक कार्यक्रमहि सरकारनें हातीं घेतल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक दुःस्थितीचा प्रश्न सुटणें सुलभ होईल. त्यांच्या उत्पन्नांत वाढ होऊन रहाणीमध्यें सुधारणा झाल्याविना शेतकऱ्यांची आर्थिक प्रगति होणार नाहीं. मुंबईच्या प्रधानमंडळास ह्याची जागरूकता आहे, हें त्यांच्या कार्यक्रमावरून स्पष्ट दिसून येतें.

## ग्रेट-ब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील वाटाघाटी

ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ह्या देशांच्या प्रतिनिधींच्या बैठकीस ता. १७ रोजीं प्रारंभ झाला. ह्या बैठकीचा उद्देश ग्रेट-ब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील वादग्रस्त मुद्यांची चर्चा करणें, हा आहे. १९२२ सालच्या पार्लमेंटच्या कायद्यानें दक्षिण आयर्लंडला कॅनडा वसाहतीप्रमाणें अधिकार देऊन 'आयरिश फ्री स्टेट'ची स्थापना केली. तथापि उत्तर आयर्लंडमधील (आल्स्टरमधील) लोकांस होमरुल नको असल्यामुळें त्याचे प्रतिनिधी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें पूर्वींप्रमाणेंच अजून बसतात. डी व्हॅलेरास ही फाळणी अमान्य असून आयर्लंड हें अविभाज्य आहे, असें त्याचें म्हणणें आहे. ह्या प्रश्नास पुनः चालना देण्याचा डी व्हॅलेराचा बेत आहे. आयरिश फ्री स्टेटच्या बंदरांचें ब्रिटिश सैनिकांमार्फत रक्षण व होमरूल स्थापन होण्यापूर्वी दक्षिण आयर्लंडमध्यें ब्रिटिश लोकांच्या ताब्यांत असलेल्या जमिनींबाबत आयर्लंडनें ग्रेट ब्रिटनला सालिना द्यावयाच्या खंडणीची तहकुबी, हे प्रश्नहि डी व्हॅलेरा उपस्थित करणार आहेत. उत्तर आयर्लंडचा, स्वतंत्र प्रजासत्ताक आयर्लंडला सामील होण्यास विरोध आहे व तो व्यक्त करण्यासाठीं तेथील प्रधानमंडळानें आपल्या पार्लमेंटची फेरनिवडणूक करण्याचें ठरविलें आहे.

---

### सुक्या मेव्याचे व्यापारी श्री. द. ना. हेजीब

पुणें येथील सुक्या मेव्याचे सुप्रसिद्ध व्यापारी, श्री. दत्तात्रय नारायण हेजीब, हे बालदिनाकरितां दरसाल सुक्या मेव्याच्या पुड्या पुरवीत असतात. यंदाचे सालच्या बालदिनाचे वेळीं पुणें व सोलापूर येथील मिळून सुमारें ४५ हजार पुड्यांची मागणी त्यांनीं तत्परतेनें पुरविली, ह्या कारणानें त्यांचा लौकिक आतां चिरस्थाई झाला आहे. सुक्या मेव्याचा प्रसार करण्याचें श्रेय श्री. हेजीब ह्यांस असून ह्या क्षेत्रांत त्यांनीं अभिनंदनीय यश मिळविलें आहे.

## मुंबई कायदेमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

ट्रेड यूनियन्स कायद्यान्वयें नोंदण्यांत आलेल्या कामगार संघांना मान्यता देण्यास कारखानदारांस भाग पाडणारें, श्री. झाबवाला ह्यांचें बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें फेटाळून लावलें. कारखानदारांच्या मान्यतेविना अशा संघांस कांहीं कार्य करतां येत नाहीं, ही अडचण दूर करण्याचा श्री. झाबवाला ह्यांचा उद्देश होता.

* * *

सरकार आपल्या अधिकारांतील लोकांसाठीं किमान वेतनाचे दर निश्चित करून इतरांस उदाहरण घालून देणार आहे काय? ह्या श्री. जमनादास मेहता ह्यांच्या प्रश्नास, "सरकार ह्या बाबत काळजीपूर्वक विचार करीत आहे" असें उत्तर मिळालें.

* * *

१९३७ सालीं मुंबई इलाख्यांत ३ कोटि, ३७½ लक्ष एकर जमीन पिकांखाली होती. पीक येण्याजोगी फारच थोडी जमीन आतां शिल्लक आहे व तींत पाण्याखाली येण्याजोगी जमीन सांपडणें मुष्कीलच आहे, अशी माहिती महसूल मंत्री श्री. मुरारजी ह्यांनीं दिली.

* * *


पुण्यांत फक्त १ च
मनपसंत कपडे शिवून देणारें
दि डेक्कन टेलरिंग फर्म
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४.
नवीन कापडाचा जंगी स्टॉक.
चालक—एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई
(सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी.)
आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.
श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें (२)

## रिझर्व्ह बँक आणि शेतीचा धंदा

### बँकेनें गव्हर्नर जनरलला सादर केलेला रिपोर्ट

हिंदुस्थानांत आधुनिक पद्धतीच्या बँकिंगचा प्रसार फारच अल्प प्रमाणांत झालेला असून अंतर्गत व्यापार बहुंशीं संयुक्त भांडवलाच्या बँकांचे कक्षेबाहेर आहे. जुन्या पद्धतीनें व्यवहार करणारे सराफ आणि सावकार हे त्या कारणानें रिझर्व्ह बँकेच्या कार्यक्षेत्रांत येऊं शकले नाहींत. हिंदुस्थान हा देश शेतीप्रधान असल्यामुळें जनतेच्या आर्थिक प्रगतीचे दृष्टीनें हिंदी मध्यवर्ती बँकेवर शेतीच्या धंद्यास सहाय करण्याची जबाबदारी टाकणें आवश्यक आहे, ह्याविषयीं सर्वत्र एकवाक्यता असली तरी सराफ व सावकार ह्यांस शेड्यूल्ड बँकांचे बरोबरीनें स्थान मिळणें अशक्य होतें. तथापि, शेतीचा धंदा व रिझर्व्ह बँकेचा व्यवहार ह्यांची सांगड घातल्याखेरीज असंघटित व मागसलेल्या शेतकरी वर्गास बँकेचा उपयोग होणार नाहीं, ह्याविषयीं दुमत नव्हतें. तीन वर्षांचे आंत ( ३१ डिसेंबर, १९३७ पूर्वी ) रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधांत चौकशी करून गव्हर्नर-जनरल-इन्-कौन्सिलकडे रिपोर्ट करावा व आवश्यक ती कायद्याची दुरुस्ती सुचवावी, असें रिझर्व्ह बँकेच्या कायद्याचे ५५ व्या कलमांत सांगितलें आहे. रिझर्व्ह बँकेनें हा रिपोर्ट आतां सादर केला असून शेतीच्या धंद्याबाबतचें बँकेचें धोरण त्यांत बँकेनें स्पष्ट केलें आहे. बँकेच्या रिपोर्टाचा सारांश खालीं दिला आहेः—

( १ ) हिंदी शेतीचा धंदा हा एक किफायतशीर व्यवसाय नसून, तो जगण्याचा केवळ एक मार्ग आहे. शेतकऱ्यांजवळ पुरेसें तारण नाहीं व त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतीपासून नफा होण्याचा संभव अत्यंत अल्प आहे. शेतीमध्यें सुधारणा झाल्याविना शेतकऱ्याच्या कर्जाचा प्रश्न सुटणार नाहीं.

( २ ) शेतकऱ्यास नुसतें कर्ज मिळून त्याची नड भागली म्हणजे त्याची प्रगति होईल, असें नाहीं. शेतीमध्यें सुधारणा घडवून आणण्यास त्यास परावृत्त करील अशी कांहीं तरी व्यवस्था झाली पाहिजे. सहकारी पतपेढ्यांचे मार्फत हें कार्य होऊं शकेल. सहकारी चळवळीचें ह्या दृष्टीनें महत्त्व विशेष आहे.

( ३ ) पिकांचा उठाव करण्यास सहाय करण्याचें काम व्यापारी बँका उत्कृष्ट रीतीनें करूं शकतील. मालाच्या प्रतवारीची व माल सांठवण्याची व्यवस्था, वायद्याच्या व्यवहारांची प्रथा इत्यादि गोष्टी त्यापूर्वी संघटितपणें अंमलांत आल्यास बँकांचें कार्य सुकर होईल. शेतकऱ्यास त्यामुळें आपल्या मालाबद्दल रास्त किंमत मिळूं शकेल.

( ४ ) सरकार शेतकऱ्यास नडीचे प्रसंगीं तागाई कर्ज देतें, परंतु कर्जें देण्याचा व्यवहार सहकारी पतपेढ्या व जमीन गहाणाच्या बँका ह्या ज्यास्त हिशेबी पद्धतीनें करूं शकतात. सरकारनें ह्या संस्थांच्या कार्यास पोषक असें धोरण आखून, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व रहाणी सुधारण्याचा यत्न करावा.

( ५ ) सावकारांवर अनेक प्रांतांत नियंत्रण घालण्यांत आलें आहे व त्यामुळें शेतकऱ्यांस पूर्वीइतक्या सुलभतेनें कर्जें मिळत नाहींत असा अनुभव आहे. मात्र, पैशाचे अभावीं जमीनींत पेरणी होऊं शकली नाहीं, अशी तक्रार अद्याप ऐकूं येत नाहीं. व्याजाचा दर निश्चित करणें, हिशेब चोख राखणें, कर्जदारांस पावत्या देणें, इत्यादि नियम गरीब व नडलेल्या शेतकऱ्यांचे संरक्षणाकरितां केलेले आहेत; सावकारांनीं त्यांस भिण्याचें कारण नाहीं. सावकारी धंद्याचें नियंत्रण, सावकारांस लायसेन्सची सक्ती, त्यांच्या हिशेबाची तपासणी इत्यादि मार्गांनीं हा धंदा सुनियंत्रित करण्यांत यावा.

( ६ ) शेतकऱ्यांच्या जुन्या कर्जांची छाननी करून त्यांस दुःस्थितींतून सोडविण्याकरितां कसोशीनें प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. दिवाळखोरीचा अवलंब जरूर त्या ठिकाणीं करतां येईल, अशी कायद्यांत तरतूद पाहिजे.

(७) सहकारी चळवळ ही शेतकऱ्यांस परिणामकारक रीतीनें तारूं शकेल, असें वर सुचित केलेलेंच आहे. ह्याकरितां, त्या चळवळींतील दोष काढून टाकून इष्ट त्या सुधारणा हातीं घेतल्या पाहिजेत. थकबाकीमुळें नवीन कर्जाचा प्रवाह तुंबून बसतो, ह्यासाठीं ही बाकी कमी करण्याचा यत्न जारीनें झाला पाहिजे. प्रश्नाचें महत्त्व व गांभीर्य हीं ध्यानांत वाळगून उपाययोजनाहि सत्वर व अनेकविध होणें आवश्यक आहे. पीक बुडालें म्हणजे शेतकऱ्यास कर्जफेड करणें अशक्य होतें. अशा आपत्तीचे प्रसंगीं, परतफेडीची मुदत लांबविणें अगर कांहीं रकमेची माफी देणें सोसायट्यांस शक्य व्हावें ह्याकरितां त्यांनीं रिझर्व्ह फंड वाढवावे. मोसमाचे अखेर फिटतील अशींच नवीन कर्जें देण्यांत यावींत.

( ८ ) प्राथमिक पतपेढ्यांची संपूर्ण सहकारी तत्त्वांवर पुनर्रचना करून, शेतकऱ्यांचें जीवन सर्वांगांनीं सुधारण्याचा यत्न पतपेढ्यांमार्फत व्हावा अशी व्यवस्था अंमलांत यावी. मालाची विक्री सहकार्यानें केल्यास शेतकऱ्याचे पदरीं ज्यास्त पैसा पडेल व बाहेरच्या बाजारांतील व्यवहाराची त्यास माहिती होईल. ह्या दृष्टीनें सुरवातीस लहान प्रमाणावर मालविक्रीच्या योजना आखण्यांत याव्यात.

(९) प्रांतिक व सेंट्रल बँकांनीं सहकारी चळवळीच्या प्रसारास उत्साहानें मदत केली पाहिजे. ह्या बँकांचे व्यवहार व्यापारी बँकांचे धर्तीवर चालणें इष्ट आहे. विशेषतः, सहकारी बँकांनीं पुरेशी रोख अगर सहज उभी करतां येण्याजोगी रकम कायम जवळ राखली पाहिजे. हिशेब ठेवण्याची पद्धत निरनिराळ्या ठिकाणीं वेगवेगळी असलेली आढळते; व्यापारी बँकांची पद्धत त्यांनीं अंमलांत आणणें इष्ट आहे.

( १० ) जुन्या कर्जाचे फेडीकरतां जमीन गहाणाच्या बँका नवीन रकमा सढळपणें कर्जाऊ देत आहेत, परंतु सहकारी पतपेढ्यांनीं मागें केलेल्या चुकीची त्यामुळें पुनरावृत्ति होण्याचा संभव आहे. जमिनीच्या किंमतीपेक्षा कर्जदाराची परतफेड करण्याची

अप-टु-डेट शिलाई करतां
माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ म्हादी भांडाराचे माडीवर

ऐरत ही ज्यास्त महत्त्वाची गोष्ट आहे. परतफेड वक्तशीर व्हावी, ह्यासाठी सहकारी पतपेढ्या व जमीन गहाणाच्या बँका ह्यांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा असावा अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे. जमिनीची सुधारणा, जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, इत्यादि गोष्टींचा पुरस्कार जमीन गहाणाच्या बँकांनीं करणें आवश्यक आहे. ह्या बाबतींत सरकारच्या शेतकी खात्यानें सहकार्य केलें पाहिजे. सहकारी खात्याची कार्यक्षमता वाढली पाहिजे व नोकरवर्ग लायक आणि दक्ष असा असणें जरूर आहे.

( ११ ) सहकारी संस्था व सावकार ह्यांस रिझर्व बँकेनें कर्ज देऊन, त्यांचे द्वारा शेतकऱ्यांची नेहेमीची नड भागवणें हें रिझर्व्ह बँकेचें काम नाहीं. सहकारी व व्यापारी बँका ह्यांनीं भांडवल स्वतःच जमवलें पाहिजे. क्वचित् प्रसंगीं पैशाचा पुरवठा कमी पडला, तर रिझर्व्ह बँक त्यांस मदत करील. रिझर्व्ह बँकेनें कोणत्या तारणावर कसे पैसे द्यावेत, हें ॲक्टानें निश्चित केलेलें आहे. तात्कालिक नड भागविण्याकरितांच ही रकम देण्यांत येत असल्यानें, रिझर्व्ह बँकेकडून घेतलले पैसे ठराविक मुदतींत परत फेडावे लागणार, हें उघड आहे. प्रांतिक सहकारी बँकांस ह्या रकमेचा विनियोग स्वतः कर्जें देत रहाण्याकडे करतां येणार नाहीं.

( १२ ) सहकारी चळवळ सर्वव्यापी होऊन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीस हातभार लावण्यास ती समर्थ होणें ही कालांतराची गोष्ट आहे. तोंपर्यंत सावकारांवरच शेतकऱ्यांस अवलंबून रहाणें भाग आहे. रिझर्व्ह बँकेचा शेतकऱ्यांस कांहीं उपयोग व्हावयाचा असल्यास, ह्या सावकारांचे व्यवहार सुनियंत्रित होऊन ते बँकेच्या कार्यक्षेत्रांत येणें अत्यावश्यक ठरतें. मालाचे तारणावर दिलेल्या कर्जास धोका कमी असतो, परंतु शेतकऱ्यांची बहुतेक सर्व कर्जें अशा तारणावर घेतलेलीं नसतात. व्यापारी बँका हुंड्या डिस्कौंट करतेवेळीं ह्या बाबत चौकशी करणार हें उघड आहे. शेतीच्या मालाचे आधारावर काढलेल्या हुंड्या शेड्यूल्ड बँकांनीं डिस्कौंट केल्या, तर ह्या हुंड्या सवलतीचे दरानें रीडिस्कौंट करण्यास रिझर्व्ह बँक तयार होईल, असें तिचें म्हणणें आहे. म्हणजे शेतकऱ्यांस अल्प व्याजाचे दरानें कर्ज मिळूं शकेल.

( १३ ) सराफ व सावकार ह्यांनीं व्यापारी बँकांचे पद्धतीनें हिशेब ठेवण्यास प्रारंभ करून बँकिंगच्या व्यवहारांखेरीज इतर व्यवहार त्यांनीं करूं नयेत असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें होतें. परंतु, देशी पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या सराफ–सावकारांस हें पटलें नाहीं. व्यापारी बिलांचा प्रसार झाल्याविना रिझर्व्ह बँक शेतीच्या धंद्यास विशेष मदत करूं शकणार नाहीं. ही अडचण निवारण करण्याचा यत्न बँक करीत राहील.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२५,००० वसूल झालेलें भांडवल १,१२,४००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "**कॉमनवेल्थ**" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

**श्री. आर. एन. अभ्यंकर,** बी. ए., एलएल. बी.,
**मॅनेजिंग एजंटस्,**
**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड**
**११ बुधवार पेठ, पुणें नं. २.**

**महाराष्ट्रांतील** प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

**" अर्थ " ग्रन्थमाला**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

## बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास, मागील वर्षातून ओढलेले ६,८७,१७१ रु. १५ आ. ४ पै धरून एकूण झालेला नफा:—२८,४९,५७७ रु. १२ आ. ४ पै

| | रु. आ. पै |
|---|---|
| चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स देण्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद ... ... | २,५०,०००–०–० |
| ३० जून, १९३७ रोजीं पहिल्या सहा माहीचें १० टक्के दरानें डिव्हिडंड जाहीर केलें, त्याबद्दल दिलेली रकम ... | ५,००,०००–०–० |
| नफा वाटणीकरतां आतां २०,९९,५७७ रु. १२ आ. ४ पै रहातात. | |
| ३१ डिसेंबर अखेरच्या वर्षाचें १० टक्के दरानें करमाफ डिव्हिडंड कायम करण्याचें डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे. ... ... | ५,००,०००–०–० |
| प्रत्येक भागास ८ आणे ( दरसाल १% ) प्राप्तीवरील करमाफ बोनस ... | १,००,०००–०–० |
| बँकेच्या मालमत्तेचे खातीं वर्ग ... | ४,००,०००–०–० |
| बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग ... | २,५०,०००–०–० |
| पुढील वर्षात ओढण्याकरितां (नोकर वर्गास बोनस दिल्यास तो ह्यांतून द्याव-याचा आहे ) ... ... | ८,४९,५७७-१२-४ |


### व्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत

डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.


## टेलर्स सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल

### जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

हिज हायनेस दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील असलेलें जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲण्ड कटिंग या संस्थेतील विद्यार्थ्यांची परीक्षा कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन ( बॉम्बे प्रेसिडेन्सी ) तर्फे ता. १९ डिसेंबर, १९३७ रोजीं घेण्यांत आली. परीक्षेंत कॉलेजचे सर्व विद्यार्थी पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले.

### किनाऱ्यालगतच्या समुद्रावरील वहातुक

हिंदुस्थानच्या किनाऱ्यालगतच्या समुद्रावरील मालाची वहातुक हिंदी कंपन्यांकरतां राखून ठेवण्यांत यावी, अशी आज कित्येक वर्षांची हिंदी जनतेची मागणी आहे. विदेशी कंपन्यांच्या स्पर्धेमुळें ह्या धंद्यांतील ३२ पैकीं २३ हिंदी कंपन्या बुडाल्या असून उरलेल्या कंपन्यांस विदेशी कंपन्यांशीं मिळतें घेऊन आपला चरितार्थ चालवावा लागतो. शेकडा ७५ टक्के वहातुक विदेशी कंपन्यांचे हातीं आहे. सुमारें १३ कोटि रुपयांचें हिंदी भांडवल ह्या व्यापारांत गुंतविण्यांत आलें होतें, त्यापैकीं ८ कोटि रुपयांचें भांडवल नामशेष झालें असून आतां फक्त ४ कोटींवरच व्यवहार चालू आहे. वरील माहिती श्री. जे. पी. मेहता ह्यांनीं आपल्या एका भाषणांत दिली.


पत्ता बदलला

**मराठी केन्द्र**

ही

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.






पुणें एजंट:—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.



### भारतीय अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, महकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| **बँक रेट** ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०–१० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८– ६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४६–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११६—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३३—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १६००—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२४—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६१—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११९–११ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १२२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५०५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १६१–१४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २२—९ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ४ आ. ... | ४१–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,४५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६३—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २५२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १,०८५—८ |

### सोनें–चांदी–साखर

| | |
|---|---|
| **सोनें** ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—७ |
| **चांदी** ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४९–१४ |
| **साखर** जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—८ |
| „ **केसर** प्रत्येक मणास ... ... | ११–१० |
| „ **सरया** प्रत्येक मणास ... ... | ११—४ |

NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.




**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४; किंवा प्रथम ६८८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## हरिपुरा येथील अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन

### हस्तपत्रक नंबर २

**हातानें बनविलेल्या वस्तूंच्या कारागिरांस अमूल्य संधी**

**दुकानांची रचना व भाडें:**—ह्या प्रदर्शनांत एक विभाग हातानें बनविलेल्या वस्तूंच्या दुकानांसाठी ठेविला आहे. प्रत्येक दुकान साधारणत: १०'×१२' आकाराचें असेल. १०० ते १२५ दुकानांची सोय ह्या भागांत केली आहे. खादी विभाग मध्यें ठेवून त्याचे भोंवती ग्रामोद्योग वस्तूंचीं दुकानें असतील. प्रत्येक दुकानाचें भाडें त्या स्थळाचें महत्वानुसार रुपये ३० ते १०० पर्यंत राहील. प्रदर्शन ता. १० ते २१ फेब्रुआरी अखेर उघडें राहील. वेळ दुपारीं १ ते रात्रीं ९ वाजेपर्यंत.

**प्रदर्शनांत विक्री करण्याच्या वस्तू:**—ह्या विभागांत खालील तऱ्हेच्या वस्तू विकण्यास वाव आहे:—

(१) चटया, आसनें व निरनिराळ्या प्रकारचें बांबूकाम, (२) मातीचीं भांडीं, (३) मृत जनावरांच्या चामड्याचे पदार्थ, (४) हातानें बनविलेले कागद, (५) शिंगांचीं कामें, (६) लोखंडी वस्तू, (७) तांब्या–पितळेचीं भांडीं, (८) लांकडाचीं खेळणीं व इतर पदार्थ, (९) सोनें, रूपें, जर, यांचे पदार्थ, (१०) वेतकाम, (११) चाकू, सुऱ्या, अडकित्ते, कातऱ्या, कुलपें इ. (१२) शेतीचीं औतें, (१३) संगमरवरी, शहाबाद वगैरे दगडांचे पदार्थ व त्यावरील खोदकाम, (१४) हस्तीदंत व चंदन यांचे निरनिराळे पदार्थ, (१५) शाई, (१६) धुपेल, कुंकू, बुका वगैरे सुवासिक पदार्थ, (१७) फळांची मिठाई, मुरंबे, (१८) दिलरुबा, वीणा, सारंगी इ. वाद्यें, (१९) उदबत्ती, धूप वगैरे, (२०) राष्ट्रीय पुस्तकें, (२१) खेड्यांतील औषधें व वनस्पती.

ह्याशिवाय एक कलाकौशल्य विभाग ठेवण्यांत आला आहे त्यांत सर्व प्रकारचीं, विशेषत: हस्तकौशल्याचीं, निरनिराळीं कामें व पदार्थ ठेवण्यांत येतील.

प्रदर्शनांत पाठविण्याच्या मालाबद्दल रेल्वे कंपन्यांनीं सवलत ठेविली आहे. तिची मुदत तारीख ९-१-३८ ते ७-३-३८ पर्यंत राहील

दुकानदारांनीं रहाण्याची सोय दुकानांत करावी. निराळी जागा जादा भाड्याशिवाय मिळणार नाहीं. विजेचे दिवे रात्रीं प्रदर्शनाचे वेळीं मिळतील. दुकानदारांना प्रदर्शनाचे नियम पाळावे लागतील.

मंत्री,
खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन,
हरिपुरा, ता. १-१-३८.
पोस्ट कॉंग्रेस कॅंप, जि. सुरत.

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें

### कै. आचार्य रबडे बक्षीस

कै. आचार्य रबडे यांचे स्मरणार्थ टिळक महाराष्ट्र विद्यापीठानें दरसाल एक निबंध मागवून उत्कृष्ट निबंधास ५० रुपयांचें बक्षिस ठवलेलें आहे. यंदाचा सदर निबंधाचा विषय "महाराष्ट्रांतील ग्रामोद्योगाचा इतिहास, त्याची आजची स्थिति व ती सुधारण्याचे उपाय" हा निश्चित केला आहे. सदरचा निबंध लिहून टि. म. विद्यापीठाचे कचेरींत तारीख १ मे, १९३८ पर्यंत पोहोंचता झाला पाहिजे. निबंध मराठी भाषेंत लिहिलेला असून त्याची लांबी सुमारें ७५ ते १०० फुलस्केप टाईप केलेलीं पानें इतकी असावी.


**माधवाश्रम**

**माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

ह्या आश्रम ट्रॅमच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांवर आहे. जागा मध्यवर्तीत, हवाशीर व लागणारें फर्निचरनें श्रृंगारीत व व्यवस्थित खोल्या असून सरदार, श्रीमंत, विद्यार्थी, व्यापारी, वगैरे उच्च हिंदु लोकांस राहण्यास व भोजनाचे स्वच्छतेमुळें तसेंच इलेक्ट्रीक लाईट, पंखे (फर्स्टक्लासमध्यें) वगैरे सोयीमुळें जागा अत्यंत शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहाणारांची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

**रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.**

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

**भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१९ सदाशिव पेठ.**

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यत: विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, **पुणें शहर.**

# एव्हर सिल्व्हर

वापरून

**कल्हईचा खर्च वांचवा.**

या धातूचीं भांडीं कळकत नाहींत व त्यांना सहज पोचे येत नाहींत आणि तीं दिसण्यांत फारच सुबक असतात.

**सोलापुरांत मिळण्याचें ठिकाणः—**
**दि टिकेकर टेक्स्टाईल मिलसचें दुकान.**
कसबा पेठ, मेन रोड, सोलापूर.

**ओगले ग्लास वर्क्स लि०**
पो. ओगलेवाडी.
सं. औंध. जि. सातारा.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण बदलली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये?

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

**तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.**

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

# फक्त तीनच वर्षें—

## विम्याचे हप्ते भरा

पुढें कोणत्याही कारणामुळें जरी तुम्हांस पैसे भरतां आले नाहींत तरी विम्याच्या पूर्ण रकमेची

**आम्ही हमी घेतों.**

**आजच आमच्या एक्स्टेन्डेड अॅशुअरन्स स्कीमबद्दल लिहाः—**

डॉ. आर. के. गदडे, ब्रँच सेक्रेटरी

**भारत इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड,**

: : १७०५, लक्ष्मी रोड, पुणें शहर : :

आमचें बेळगांव ऑफिस
व्ही. आर. नाईक, बी. ए., एल्एल्. बी.
इन्स्पेक्टर ऑफ एजन्सीज.
१६७६, बेगमवेस, बेळगांव.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.